आकांक्षित तालुका कार्यक्रम २०२६-२७ राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.११/का.१४१२**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २४ ऑगस्ट, २०२६.

वाचा: १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.११/का.१४१२, दि.२० एप्रिल, २०२६
२. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.११/का.१४१२, दि.२१ जुलै, २०२६

**प्रस्तावना:**

राज्याच्या संतुलित, सर्वांगीण व गतिमान विकासासाठी आकांक्षित जिल्हा व तालुका कार्यक्रमाचा विस्तार करण्यात आला असून दिनांक २०.०४.२०२६ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील गडचिरोली, नंदूरबार, धाराशिव, वाशिम, हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या १० जिल्ह्यांची व एकूण १७७ तालुक्यांची निवड '**विस्तारित आकांक्षित जिल्हे व तालुके**' म्हणून करण्यात आली आहे. नव्याने निवड करण्यात आलेल्या १७७ आकांक्षित तालुक्यांच्या संतुलित, सर्वांगीण व गतिमान विकासासाठी कार्यक्रम राबविण्याकरिता मार्गदर्शक सूचना दिनांक २१.०७.२०२६ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत.

राज्यातील १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये आकांक्षित तालुका कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील सनियंत्रण समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. राज्य स्तरावरील संनियंत्रण समितीमध्ये आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय यांचा सदस्य म्हणून समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

राज्यातील १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये आकांक्षित तालुका कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या सनियंत्रण समित्यांमध्ये दिनांक २१ जुलै, २०२६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.५ मधील राज्यस्तरीय समितीमध्ये अ.क्र. ४ नंतर अ.क्र. ५ येथे आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, मुंबई यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८२४१२५७०७१०१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by DATTATRAY HANMANT KADAM
Date: 2026.08.24 12:58:46 +05'30'

**( दत्तात्रय कदम )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
९. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
१०.मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) विभाग यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) विभाग यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. सर्व मा. मंत्री महोदय यांचे खाजगी सचिव,
१३. सर्व मा. राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
१४. मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
१५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), विधानभवन, मुंबई,
१६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), विधानभवन, मुंबई,
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई / औरंगाबाद / नागपूर,
१८. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई / औरंगाबाद / नागपूर,
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / औरंगाबाद / नागपूर,
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
२१. महासंचालक, माहिती जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२२. सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी,
२३. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२४. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपरिषदा,
२५. सह सचिव / उप सचिव / अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२६. निवडनस्ती, कार्यासन-१४१२, नियोजन विभाग.